# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक ३१/०७/२०२४ (बुधवार) सायंकाळ

---

### अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक ३०/०७/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलीग करीत असता मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, सर्व्हिस रोडने पिपळा डाग बंगला येथे होंडा ॲक्टीव्हा गाडी क्र. MH-49/CC-0751 ने दारूची अवैध वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून **आरोपी नामे— राहुल कवडूजी वरठी वय २८ वर्ष रा. हनुमान मंदीर जवळ वार्ड नं. ४ ता. सावनेर** हा त्याची होंडा ॲक्टीव्हा गाडी क्र. MH-49/CC-0751 ने सर्व्हिस रोडने पिपळा डाग बंगलाकडे भरधाव वेगाने गाडी घेवुन जाताना दिसल्याने त्याची गाडी थांबविली असता ॲक्टीव्हा गाडीचे पायदान जवळ एका पांढऱ्या रंगाच्या नायलॉन पिशवीमध्ये ४८ निपा देशी दारू भिंगरी सत्रा नं. १ किंमती १६८०/—रू. ॲक्टीवा गाडी क्र. एम. एच— ४९/सी.सी.—०७५१ किंमती ६०,०००/— रूपये असा एकुण ६१,६८०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम ६५ ई, ६५ अ मदाका. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि श्री. धनाजी जळक, सफौ विठ्ठल वंजारी, पो. अं. आशिष मेश्राम यांनी पार पाडली.

## नागपूर ग्रामीण हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पोस्टे एमआयडीसी बोरी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता ममता रेस्टॉरेंटचे मागे पानठेल्यामध्ये **आरोपी योगेश गणेश कोणार, वय ३१ वर्षे रा. टाकळघाट ता हिंगणा जि नागपूर** हा सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळ खेळवताना मिळुन आल्याने रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून एका हिरवा रंगाच्या कागदावर सटट्पटट्रीचे आकडे लिहीलेले कागद एक दाट एक निळा रंगाचा बॉलपेन व नगदी ५२०/—रू. मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे खापा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे— ज्ञानेश्वर रामाजी गोडबोले वय ५३ वर्ष रा. बडेगाव** हा बसस्टॉप टेंभुरडोह येथे बसून लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटक्याचे आकडे पट्टीवर लिहुन हारजितचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याच्या जवळुन सट्टापटटी साहीत्य व निळया शाहीचा डॉट पेन कि. ०५ रू व नगदी ११२० रू असा एकुण ११२५ रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दिनांक ३०/०७/२०२४ रोजी पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, अंबाळा येथील टर्निंग जवळ एक इसम पानठेल्याच्या बाजूला कल्याण व राजधानी सट्टीपट्टीचे आकडयावर लोकांकडून पैसे घेवुन पैशाचे हारजितचा जुगार खेळ खेळीत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून घटनास्थळी अंबाळा येथील टर्निंग येथे जावून रेड केली असता **आरोपी नामे— उमेशकुमार रविन्द्रप्रसाद मिश्रा वय ३१ वर्ष रा. गंगाबाई घाट नागपुर ह. मु. अंबाळा ता. रामटेक** याची अंगझडती घेतली असता त्याचे शर्टच्या खिशातून एका पांढरा रंगाचे पट्टीवर कल्याण व राजधानीचे निळा शाईचे पेनाने सट्टापट्टी वरील मटक्याचे मराठीत आकडे लिहलेले, नगदी ८६०/—रू तसेच एक निळा शाईचा पेन असा एकुण ८६०/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर